**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०३ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **खासगी क्षेत्रातही संशोधन आणि विकासाला प्रोत्साहन देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **आगामी जिल्हा परिषद निवडणुकांमुळे राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन पुढं ढकललं जाण्याची शक्यता.**
3. **विदर्भ साहित्य संमेलनाचा काल यवतमाळ इथं समारोप; शेती हा विषय अभ्यासक्रमात ठेवण्यासाठीचा ठराव मंजूर.**
4. **पहिल्यांदाच आयसीसी एकदिवसीय विश्वविजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव.**

-----------------------------------------------

नवोन्मेष परिषद-२०२५

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषद २०२५ चं उद्घाटन करण्यात आलं. सरकारनं एक लाख कोटी रुपयांची संशोधन विकास नवोन्मेष योजना सुरू केली आहे, त्याचा पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. सरकारनं गेल्या दशकात व्यवसाय सुलभतेला प्राधान्य दिलं आहे. त्यातून स्टार्ट अप, सेमी कंडक्टर, हरित ऊर्जा या क्षेत्रांचा विकास होत असल्याचं पंतप्रधान म्हणाले. खासगी क्षेत्रातही संशोधन आणि विकासाला प्रोत्साहन देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. गेल्या दशकात संशोधन आणि विकासाला सरकारनं प्राधान्य दिलं आहे. त्यासाठीच्या निधीतही भरघोस वाढ केल्याचं पंतप्रधान म्हणाले. सरकारनं कृत्रिम बुद्धिमत्ता अभियानांतर्गत १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक केली असल्याचं त्यांनी सांगितलं. ते म्हणाले-

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी ३२ सेकंद)***

***भारत आज एथिकल और ह्यूमन सेंट्रिक एआइ के ग्लोबल फ्रेमवर्क को शेप दे रहा है। हमारा आने वाला एआइ गवर्नेंस फ्रेमवर्क इस दिशा में एक बड़ा कदम होगा। इसका मकसद है इनोवेशन और सेफ्टी को साथ साथ विकसित करना।अगले वर्ष***

***फरवरी में जब भारत ग्लोबल एआइ समिट की मेजबानी करेगा तो इन्क्लूसिव एथिकल और ह्यूमन सेंट्रिक एआइ के प्रयासों को नई गति मिली।***

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ जितेंद्र सिंग यांची याप्रसंगी उपस्थिती होती. शिक्षण तज्ज्ञ, संशोधन संस्था, उद्योग आणि सरकार मधल्या तीन हजारापेक्षा जास्त सहभागींना एकत्र आणणं हे या तीन दिवसीय परिषदेचं उद्दिष्ट आहे.

---------------------------------------------------

संत नामदेव महाराज सन्मान

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना काल पंजाबमधल्या घुमान इथं संत नामदेव महाराज सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर शिंदे यांनी महाराष्ट्र सदनाचं भूमिपूजन केलं. छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आणि गुरु गोविंदसिंहांचा पंजाब संतांचा आणि शूरांचा आहे. राजगुरू आणि भगतसिंहांचा क्रांतिकारी वारसा आपण जपतो. दोन्ही राज्यांमध्ये अतूट आध्यात्मिक आणि सांस्कृतिक नातं आहे, असं शिंदे यावेळी म्हणाले.

---------------------------------------------------

जीएसटी

केंद्र सरकार तर्फे करण्यात आलेल्या जीएसटी सुधारणांमुळे एकंदरच सामान्य लोकांची विविध बाबतीत बचत होत असून अनेक वस्तूंवरील कर कमी झाल्याने त्यांच्या किमती आपोआपच कमी झाल्या आहे. याबद्दल आपलं मनोगत व्यक्त केलं आहे विद्या गुजरकर यांनी-

***(होल्ड बाईट)***

***गवर्नमेंटनी जो आता जीएसटी दरांमध्ये कपात केली आहे, त्याचा भरपूर फायदा हा ग्राहकांना होताना दिसतोय आणि त्याचचं एक्सजॅम्पल म्हणून जेव्हा आम्ही चप्पल घ्यायला गेलो तर तेव्हा जीएसटी दरांमध्ये कपात झाल्यामुळे साधारण मला वाटतो. तीन ते चार टक्केचा आम्हाला फायदा झाला आणि त्यामुळे मला असं वाटतं की जो जीएसटी दरामध्ये कमी करण्यात आला आहे त्याचा ग्राहकांनी जास्तीत जास्त याचा फायदा घ्यावा.***

---------------------------------------------------

आशिष शेलार

मतदार यादीतील दुबार मतदारांच्या मुद्यावरून भाजप नेते आणि मंत्री आशिष शेलार यांनी ठाकरे बंधूंवर तीव्र टीका केली. महाविकास आघाडीच्या मोर्चात ठाकरे बंधुंनी मराठी, दलित आणि हिंदू मतदारांना फटकाविण्याची भाषा केली असून,

मुस्लिम दुबार मतदारांवर पांघरूण घातल्याचा आरोप शेलार यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत केला. मतदार यादी शुद्ध ठेवण्याच्या भाजपच्या मागणीची आठवण करून देत शेलार यांनी मविआला मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षणाला पाठिंबा देण्याचं आव्हान केलं.

------------------------------------------------

अधिवेशन पुढे ढकलले

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन अंदाजे दहा दिवसांनी पुढे ढकलले जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. आगामी 15 डिसेंबर रोजी जिल्हा परिषदेसाठी मतदान होणार असल्याने त्यानंतरच अधिवेशनाची सुरुवात होईल, अशी माहिती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात दिली. राज्य विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून नागपुरात सुरू होते. परंतु, यंदा बहुतांश पक्षांमधील नेते जिल्हा परिषदेच्या निवडणुकांमध्ये व्यस्त राहणार आहेत. हे लक्षात घेता यंदा विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन 8 ते 10 दिवस पुढे ढकलले जाऊ शकते असं बावनकुळे यांनी सांगितलं.

------------------------------------------------

एसटीसौर ऊर्जा

एसटी महामंडळाच्या मोकळ्या जागेवर तसेच कार्यशाळेच्या आणि बसस्थानकांच्या छतावर 'सौरऊर्जा प्रकल्प' उभारुन त्याद्वारे वर्षाला सुमारे ३०० मेगावॉट इतकी वीज निर्मिती करण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे. त्याद्वारे वर्षाला सुमारे १ हजार कोटी रुपये किंमतीची वीजनिर्मिती करण्याचा महत्वकांक्षी 'सौर ऊर्जा हब' उभारुन एसटीला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली. एसटी महामंडळाच्या सभागृहात आयोजित केलेल्या वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.

------------------------------------------------

विदर्भ साहित्य संमेलन

विदर्भातील शाळांमध्ये शेती हा विषय अभ्यासक्रमात ठेवण्यात यावा आणि दुष्काळामुळे आत्महत्या करणाऱ्या कुटुंबांना प्राधान्याने मदत करण्यात यावी यासह पाच ठराव दोन दिवसीय विदर्भ साहित्य संमेलनात मंजूर करण्यात आले. विदर्भ साहित्य संघ शाखा, जाम्ब आणि ईश्वर फाउंडेशन, दिग्रस यांच्या संयुक्त विद्यमाने यवतमाळ इथं दोन दिवसीय विदर्भ साहित्य संमेलन संपन्न झाले. काल रात्री नऊ वाजता या संमेलनाचा समारोप झाला. डॉक्टर रमाकांत कोलते हे या साहित्य

संमेलनाचे अध्यक्ष होते. आपली भाषा मृतप्राय होऊ नये यासाठी साहित्यिकांनी प्रयत्न केले पाहिजे असं प्रतिपादन कोलते यांनी केलं. प्रमुख अतिथी म्हणून माजी शिक्षण मंत्री प्राध्यापक वसंत पुरके देखील संमेलनाला उपस्थित होते. दोन दिवस चाललेल्या साहित्य संमेलनामध्ये विविध परिसंवाद, कथाकथन, कवी संमेलन, गझल संमेलन, आयोजित करण्यात आले होते.

---------------------------------------------------

महिला क्रिकेट संघ

भारतीय महिला क्रिकेट संघानं काल इतिहास रचत दक्षिण आफ्रिकेचा 52 धावांनी पराभव करून पहिल्यांदाच आयसीसी विश्वचषकाचं विजेतेपद पटकावलं. मुंबईतील डी. वाय. पाटील मैदानावर पावसामुळे उशिरा सुरू झालेल्या सामन्यात स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी शतकी भागीदारी करत भक्कम पाया रचला आणि भारताने दक्षिण आफ्रिकेला 299 धावांचे आव्हान दिले. प्रत्युत्तरात आफ्रिकेची कर्णधार लॉरा वुलव्हार्डच्या शतकानंतरही संघ 246 धावांवर गारद झाला. दीप्ती शर्माने 5 बळी घेत संघाच्या विजयात मोलाचं योगदान दिलं आणि मालिकावीर ठरली, तर शफाली वर्माला सामनावीर घोषित करण्यात आलं. मराठमोळे प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय महिला संघानं ही ऐतिहासिक कामगिरी केली. विजयानंतर देशभरात जल्लोष साजरा झाला असून राष्ट्रपती, पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनी संघाचं मनापासून अभिनंदन केलं. बीसीसीआयने संघासाठी ५१ कोटी रुपयांच्या रोख पारितोषिकाची घोषणा केली आहे. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात महिला क्रिकेट संघाचं विश्वविजेतेपदाबद्दल अभिनंदन केलं. हे यश प्रेरणादायी असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी २२ सेकंद)***

***पूरा भारत अपनी क्रिकेट टीम की सफलता से बहुत खुश हैं। यह भारत का पहला वुमेन्स वर्ल्ड कप है। मैं हमारी वुमेन क्रिकेट टीम को बहुत बहुत बधाई देता हूँ। हमें आप पर गर्व है। आपकी ये सफलता देश के करोड़ों नौजवानों को प्रेरित करेगी।***

---------------------------------------------------

आंदोलन

डॉ.संपदा मुंडे यांना न्याय मिळावा या मागणीसाठी डॉक्टरांच्या विविध वैद्यकीय संघटना एकत्र येत नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय इथल्या डॉक्टरांनी आंदोलन केलं. निवासी डॉक्टरांची संघटना मार्डनं कालपासून मेयो मधील ओपीडी वर बहिष्कार टाकला असून काम बंद आंदोलन सुरू केलेलं आहे.

---------------------------------------------------

डॉ.भोयर

अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 31 हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले आहे. त्याअंतर्गत रब्बी हंगामातील बियाणे खरेदीसाठी प्रती हेक्टर 10 हजार रुपयांची मदत देण्याचा प्रस्ताव वर्धा जिल्ह्यासाठी सादर करण्यात आला आहे.

---------------------------------------------------

सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट

पीपल्स एज्युकेशन सोसायटीला शैक्षणिक आणि विकासकामांसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांचा बुलढाणा इथं नागरी सत्कार करण्यात आला.

---------------------------------------------------

हवामान

येत्या काही तासात नागपूर जिल्ह्यात ठिकठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाच्या सरी पडण्याची शक्यता आहे, तर अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये ठिकठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरींची शक्यता आहे.

---------------------------------------------------